# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.comWebsite : http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्सनंबर (०२२) २७४५ ३८२०.

क्र. विससं/उशि/कोविप/लेखा/वेतन/सप्टेबंर/२०२२/ 2319 दिनांक :१३.०९.२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व अधिनस्थ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, जि. ठाणे
पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदुर्ग -

**विषय :- माहे सप्टेंबर -२०२२ चे वेतन देयक तयार करणे बाबत...**

उपरोक्त विषयाबाबत महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, **आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सनदी लेखापालाने सांक्षाकिंत केलेले लेखापरिक्षण अहवाल माहे सप्टेंबर - २०२२ च्या वेतन देयकासोबत सादर करणे अनिवार्य आहे. सदर लेखापरिक्षण अहवाल वेतन देयकांच्या हॉर्ड कॉपी सोबत प्रस्तुत कार्यालयास सादर केल्यानंतरच महाविद्यालयाचे वेतन अनुदान देयकावर पुढील वर्गीकरण / अदायगीबाबतची कार्यवाही करण्यात येणार नाही. याची प्राचार्य तथा आहरण व संवितरण अधिकारी यांनी व्यक्तिशः नोंद घेण्यात यावी. तसेच ज्या महाविद्यालयांनी प्रस्तुत कार्यालयाकडे आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सनदी लेखापालाने सांक्षाकिंत केलेले लेखापरिक्षण अहवाल सादर केले आहे त्या महाविद्यालयांनी प्रस्तुत कार्यालयाकडे सादर केल्याची पोच वेतन देयकासोबत जोडण्यात यावी.**

- **भहागाई भत्ता वाढीच्या फरकाच्या रक्कमेवरील डीसीपीएस कपात करण्यात यावी.**

माहे **सप्टेंबर -२०२२** चे वेतन देयक तयार करण्यासाठी माहे **ऑगस्ट -२०२२** च्या वेतन देयकाचा **कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे अचूक नोंद घ्यावी.**

**खाली दिलेल्या वेळेप्रमाणेच वेतन देयक पाठविण्यात यावे. उशीरा प्राप्त होणारे वेतन देयक स्वीकारले जाणार नाही.**

| अ.क्र | महाविद्यालयाचे कोड | कोषागार प्रमाणक (व्हाऊचर) क्रमांक व दिनांक | डिसीपीएस प्रस्तुत कार्यालयाकडून अँप्रूव्ह करुन घेणे | Bill Generate करुन Forward करणे |
|---|---|---|---|---|
| १. | **TB- ०१** | **V.No ६८/ dt.२९.०८.२०२२** | दि.१३.०९.२०२२ ते १४.०९.२०२२ | दि.१५.०९.२०२२ ते दि.१९.०९.२०२२ दुपारी -२.०० वाजेपर्यंत |
| २. | **RT -०९** | **V.No ७०/ dt.२९.०९.२०२२** | | |
| ३ | **उर्वरित सर्व महाविद्यालये** | **V.No ६६/ dt.२९.०९.२०२२** | | |

सेवार्थ प्रणालीमध्ये Worklist > Payroll > Payroll Generation/View > View / Approve / Delete Bill याप्रमाणे जाऊन आपला कोषागार प्रमाणक नोंदवून आपले ऑगस्ट - २०२२ चे बिल प्रथम अँप्रूव्ह करुन घ्यावे. ही प्रोसेस प्रथम पूर्ण झाल्याशिवाय पुढील कोणतीही कार्यवाही करु नये.

**माहे सप्टेंबर - २०२२ च्या वेतन देयकातील देय बाजूच्या व कपातीबाजूच्या सर्व रकमा अचूक असल्याची खात्री करुन त्यानंतरच देयक सेवार्थ प्रणालीमधून Forward करावे.** याप्रमाणे आपले माहे **सप्टेंबर -२०२२ चे वेतन देयक उशीरात उशीरा दि. १९.०९.२०२२ दुपारी २.०० वाजेपर्यंत सेवार्थ प्रणाली मध्ये तयार करुन Forward करावयाचे आहे.**

वेतन देयकाची ५६ कॉलमची Salary Sheet व एचटीई सेवार्थ प्रणालीतून तयार होणारे देयक यांची रक्कम सारखीच असली पाहिजे. या Salary Sheet मधील सर्व कॉलम अचूक भरलेले असले पाहिजेत. यामध्ये सलग माहिती भरण्यात यावी. मध्ये Blank Rows सोडू नयेत. रकाना क्र.४ HTE Sevaarth ID रकाना क्र.१० Designation मधील माहिती पुन्हा तपासावी व ती अचूक नोंदविण्यात यावी. Regular Principal/Incharge Principal या बाबतची माहिती अचूक नोंदवावी. तसेच या फाईल मधील सर्व शीटस

(Imp. Instruction), Abstract, SS, Utiliz Diff Sheet) मधील सर्व संबधित रकान्यामधील माहिती पूर्ण भरण्यात यावी. हो माहोती अपूर्ण असल्यास व ही फाईल (Salary Sheet) प्राप्त झाल्याखेरीज आपले देयक मंजूर केले जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही एक्सेल फाईल jdpanvelsalary@gmail.com या इमेलवर न चुकता पाठवावी.

**जे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी माहे नोव्हेंबर -२०२२ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**माहे सप्टेंबर -२०२२ चे वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

| अ.क्र | महिना | तपशील | सहसंचालक पनवेल यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्राच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मार्च-२०२२ | वेतन | | | | |
| २ | | इतर अनूदान | | | | |
| ३ | एप्रिल- २०२२ | वेतन | | | | |
| | | म.भ.वाढ फरक | | | | |
| ४ | | वेतन | | | | |
| | मे-२०२२ | ७ वा वेतन आयोग फरक शिक्षक कर्मचारी | | | | |
| ५ | जून-२०२२ | वेतन | | | | |
| ६ | जूलै-२०२२ | वेतन | | | | |
| ७ | ऑगस्ट-२०२२ | वेतन | | | | |
| | | म.भ.वाढ फरक | | | | |
| | | एकूण | | | | |

**सदर विवरणपत्र एक्सेल व पीडीएफ प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सादर करण्यात यावे.**

**ज्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या विद्यापीठ मान्यतेची मुदत संपलेली आहे. तसेच ज्यांना अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यांनी वेतन देयक सादर करु नये. त्यांनी विद्यापीठ मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही त्वरित पुर्ण करुन नंतरच वेतन देयक या कार्यालयाकडे सादर करावीत.**

वेतन देयकाची हार्ड कॉपी खालील वेळापत्रकानिहाय या कार्यालयास फाईलमध्ये व्यवस्थित लावून व सोबत सहपत्रित केलेले प्रमाणपत्र/हमीपत्रासह तसेच हजेरी/उपस्थितीपत्रक दि. २२.०९.२०२२ पर्यंतची झेरॉक्स कॉपी प्रस्तुत कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. माहे सप्टेंबर -२०२२ ची वेतन देयकाची हार्ड व सॉफ्ट कॉपी प्राप्त झाल्याखेरीज वेतन देयक मंजूर केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. त्याशिवाय वेतन अनुदान महाविद्यालयाच्या खाती आहरित केले जाणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. ज्या महाविद्यालयाचे वेतन देयक वेळेत प्राप्त होणार नाही. व त्यामुळे वेतन अदायगी होण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राचार्यांची राहील.

**माहे सप्टेंबर - २०२२ च्या वेतनदेकाची हार्ड कॉपी प्रस्तुत कार्यालयाकडे सादर करावयाचा कालावधी जिल्हानिहाय खालील प्रमाणे**

**सदर महाविद्यालयास ज्या दिनांकास वेतनदेयकाची हॉर्ड कॉपी सादर करण्यास कळविण्यात आले आहे. त्याच दिवशी प्रस्तुत कार्यालयास उपस्थित राहणे अनिवार्य आहे. इतर दुस-या दिवशी आपले वेतन देयक स्विकारले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र | जिल्हाचे नांव | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | पालघर व रत्नागिरी | दि. २१.०९.२०२२ सकाळी १०.०० वाजता |
| २. | रायगड व सिंधुदूर्ग | दि. २२.०९.२०२२ सकाळी १०.०० वाजता |
| ३ | ठाणे | दि. २३.०९.२०२२ सकाळी १०.०० वाजता |

१. वेतननिश्चिती, बदली, इतर अनुषंगीक कारणामुळे मुळ पगारात बदल करावयाचे असल्यास त्या महाविद्यालयांनी दि. १३.०९.२०२२ व दि. १४.०९.२०२२ रोजी प्रस्तूत कार्यालयात लेखा शाखेतून प्रत्यक्ष उपस्थित राहून बदल करुन घेण्यात यावे.
२. परस्पर महाविद्यालयाच्या स्तरावर कुठल्याही प्रकारचा वेतनात बदल करु नये. तसे आढल्यास माहे सप्टेंबर - २०२२ चे वेतन अनुदान वर्ग केले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सोबत- वरील प्रमाणे

(डॉ. संजय जगताप)
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल